

## - प्रकरण दुसरे -

# संशोधन पद्धती





# - प्रकरण दुसरे -

## संशोधन पद्धती

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | ३८ |
| २.२ | सामाजिक संशोधन | ४० |
| २.३ | चित्रपट संशोधन | ४२ |
| २.४ | अन्वेषणात्मक संशोधन आराखडा | ४४ |
| २.५ | अन्वेषणात्मक अध्ययनाचे प्रमुख तीन टप्पे. | ४६ |
| | २.५ अ. साहित्य सर्वेक्षण | |
| | २.५ ब. अनुभव सर्वेक्षण | |
| | २.५ क. अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारे घटक | |
| २.६ | संशोधनाची बैठक | ४८ |
| २.७ | नमुना निवड | ५० |
| २.८ | मर्यादा | ५२ |
| २.९ | आशय विश्लेषण | ५३ |
| २.१० | सामुग्रिचे विश्लेषण, निर्वचन व अहवाल लेखन | ५४ |
| २.११ | समारोप | ५५ |
| | संदर्भसूची | ५६ |

# - प्रकरण दुसरे -

## संशोधन पद्धती

### २.१ प्रस्तावना

सामाजिक संशोधन हे विविध अंगांनी विकसित होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये प्रसार माध्यमांची संख्यात्मक वाढ होत आहे; पण या संख्यात्मक वाढीचे गुणात्मक विकासात रुपांतर करण्यासाठी शास्त्रीय संशोधनाची गरज असते. या संदर्भात कार्ल पियर्सन यांनी असे म्हटले आहे की,

**''सत्याचे आकलन होण्यासाठी जवळचा रस्ता नाही... विश्वाबाबतचे ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या गवाक्षातूनच करून घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही''...१**

या लघुप्रबंधामध्ये मराठी चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा अभ्यास करावयाचा आहे त्यासाठी योजिलेल्या संशोधन पद्धतीची या प्रकरणात चर्चा केली आहे.

**''शास्त्रांच्या सर्व शाखांसाठी शास्त्रीय पद्धत एकच आहे. तर्कशुद्ध विचार करणाऱ्या व्यक्तीकडून वापरली जाणारी अशी ती पद्धत आहे. अध्ययनाविषयांच्या साम्यात नव्हे तर अध्ययनपद्धतीच्या समरुपतेतच सर्व शास्त्रांचे साम्य प्रतिबिंबीत होते. कोणत्याही प्रकारच्या अवलोकित तथ्यांचे** (Facts) **वर्गीकरण करणारी, तथ्यांमधील परस्पर संबंधाची पाहणी करणारी व तथ्यक्रमाचे वर्णन करणारी कोणतीही व्यक्ती शास्त्रीय पद्धतीचाच उपयोग करीत असते व खऱ्या अर्थाने 'वैज्ञानिक' या संज्ञेस पात्र असते.''...२**

संवाद संशोधन हे या तत्त्वास अपवाद नाही.

**''तथ्ये म्हणजे शास्त्र नव्हे तर शास्त्रांना हाताळणारी पद्धतच आहे.'' ...३**

त्यामुळे अशी पद्धती या प्रकरणात विकसित करण्यावर भर दिला आहे. या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनाला पोषक अशी संशोधन पद्धती कशी वापरली आहे ते स्पष्ट केले आहे.

चित्रपट ही सामाजिक संस्था असून या संस्थेची निर्मिती ही विविध समाज घटकांना एकत्र आणून केलेली असते त्यामुळे हे संशोधन सामाजिक संशोधन ठरते.

''आपल्या ज्ञानेंद्रियांद्वारा उपलब्ध होणाऱ्या पुराव्यावरच सत्याची उभारणी होऊ शकते हा दृढविश्वास शास्त्रीय पद्धतीचा एक प्रमुख आधार आहे. याच अर्थाने 'चक्षुर्वैसत्यं' असे म्हणतात.

इंद्रिये देतील त्याच संवेदना व तेच ज्ञान सत्य असे अंधपणे स्वीकारण्याची शास्त्रज्ञांची तयारी नाही. इंद्रियानुभवांचे प्रामाण्य परीक्षिण्यासाठी शास्त्रज्ञ या अनुभवांना बुद्धीचा-तर्काचा निकष लावून पाहतात. अनुभवाला प्रमाण मानण्याबरोबरच अनुभवांचे परीक्षण करणारी बुद्धीही शास्त्रज्ञ प्रमाण मानतो.''...४

अशी प्रमाणता हे शास्त्रीय पद्धतीच्या वापरावर अवलंबून असते.

फेलिक्स कॉफमन यानेही सुंदर उदाहरण दिले आहे. ''संगमरवरी दगडाची मूर्ती घडविणाऱ्या शिल्पकाराकरीता त्याच्या तर्कबुद्धीतून उद्भवलेली अंतर्दृष्टी मूर्तीस आकार देण्यात सहाय्यक ठरत असली तरी मूर्ती घडवितांना दगडाचा आकार, दगडावरील रेषा व प्रकार लक्षात घेणे मूर्तीकाराकरीता जसे आवश्यक आहे, तसेच शास्त्रज्ञाने एखादे विधान तर्कसंगत वा बुद्धीसंगत आहे की नाही एवढेच पाहून चालत नाही तर त्या विधानामागे अनुभवसिद्ध पुराव्याचे बळ आहे किंवा नाही हेही लक्षात घेणे आवश्यक असते.'' ...५

असा अनुभव घेताना शास्त्रज्ञ तथ्ये संकलीत करतात व त्या आधारे अनुमाने काढतात. शास्त्रीय संशोधन हे तथ्य संकलन प्रक्रियेवर अवलंबून असते.

लॅरोबी यांने असे म्हटले आहे की-

''शुद्ध बुद्धीप्रामाण्यवादी जर कोळ्याप्रमाणे आतील केंद्रापासून सिद्धान्ताचे जाळे विणत येतात तर शुद्ध अनुभवप्रामाण्यवादी मुंगीप्रमाणे निरुपयोगी माहिती व तथ्यांचे ढीग रचीत असतात. कोळ्यापेक्षा व मुंगीपेक्षा मधमाशीच श्रेष्ठ की जी फार निवडकपणे फुलांमधील अर्क गोळा करुन त्याचे रुपांतर मधात करते.''...६

येथे संशोधकास मधमाशीची भूमिका घेऊन सत्य संकलीत करावयाचे आहे.

''सत्य हे केवळ आपल्या स्वत:साठीच नव्हे तर सर्वांसाठीच सत्य असते यावर शास्त्रज्ञांची दृढ श्रद्धा असते. म्हणून निर्णय घेतांना शास्त्रज्ञास आत्मनिष्ठ वा

**व्यक्तिगत अंश बाजूला सारता आला पाहिजे. अमुक गोष्ट सत्य आहे या निर्णयाबाबतचा शास्त्रज्ञाने केलेला युक्तिवाद केवळ त्याला स्वत:लाच नव्हे तर इतरांनाही त्याच्या इतकाच पटायला हवा.'' ...७**

त्यामुळे येथे सर्वसामान्य अशा सत्याप्रत पोहचण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

अर्नेस्ट ग्रीनवुड (Earnest Greenwood) म्हणतो -

**''तथ्यांच्या मुळाशी असणारी संबंद्धता स्पष्ट झाली की अशा तथ्यांचा एक तार्किक वर्ग बनविता येतो. अशा वर्गास आणि त्यात आढळणाऱ्या प्रतिमानास वा आकृतिबंधास लागू पडेल असे एक वर्णनप्रधान सामान्यविधान बनविता येते. ज्यांच्यात काही साम्यता आहेत अशा दोन वा अधिक तथ्य वर्गांच्या संयुक्तीकरणातून आणखी विशाल व समावेशक असा एक तथ्यवर्ग बनविता येतो. अशा अनेक व्यापक तथ्यवर्गांमध्ये ज्या वेगवेगळ्या सामान्य विधानांचा समावेश झाला आहे त्या सर्वांना आणखी व्यापक आणि अमूर्त अशा सामान्यिकरणात सामावून घेता येते. शास्त्रज्ञ अशा प्रकारे पायरी पायरीने सामान्यत्वाचा कळस गाठण्याचा प्रयत्न करीत असतात.'' ...८**

माहितीचे संकलन करुन येथे नव्याने काही सूत्रे समोर आणावयाची आहेत.

## २.२ सामाजिक संशोधन

हा अभ्यास सामाजिक शास्त्र संशोधन पद्धतीने केला आहे. या विषयी भांडारकर म्हणतात,

**''सामाजिक शास्त्रांमध्ये भविष्य वर्तविण्याची कुवत फार कमी आहे. अध्ययन विषयाची क्लिष्टता वा जटिलता आणि नियंत्रित प्रयोगांचा अभाव ही याची मुख्य कारणे आहेत.'' ...९**

हा अभ्यास प्रामुख्याने चित्रपट या माध्यमाशी निगडीत आहे. यातील विविध घटक हे अनेक पैलूंनी उपयुक्त कार्य करतात. त्यांच्याकडून तथ्ये संकलीत करणे ही काही सोपी बाब नाही. त्यासाठी कितीतरी नवे पैलू उलगडावे लागणार आहेत. सामाजिक शास्त्रातील तथ्य संकलन कार्ये ही अधिक कठीण व तेवढीच गुंतागुंतीची बनतात. त्यावर मात करून संशोधनास पोषक सामुग्री मिळवावी लागते.

निष्कर्षाच्या पुन: पुन: तपासणीवरच कोणतेही शास्त्र ठामपणे उभे असते व तेथून ते

विविध विषय वस्तुंच्या दिशांकडे वळून त्यांचे आकलन करु शकते. निष्कर्षाचे प्रामाण्य पुनः पुनः तपासून पाहणे ही शास्त्राची मुलभूत गरज आहे. या गरजेतच संशोधनाचे सर्व सार एकवटलेले आहे. कारण संशोधन (Research) या संज्ञेचा शद्बशः अर्थच Re-search म्हणजे पुनः पुनः शोध घेत राहणे असा आहे. या विषयी फेलिक्स कॉफमन म्हणतात-

**''विधानांचे प्रामाण्य सिद्ध होण्याइतकेच त्यांची अप्रमाण्यता सिद्ध होणे हेही संशोधनाच्या प्रगतीसाठी उपकारक आहे.'' ...१०**

या अभ्यासामध्ये चित्रपटांबाबतचे ज्ञान पुन्हा पुन्हा तपासून घ्यावयाचे आहे. सामाजिक संशोधन कार्यांमध्ये अनुशासित व पद्धतशीर तथ्य संकलनावर जाणीवपूर्वक भर द्यावा लागतो. या अध्ययनातील विविध पैलूंचा उलगडा हा त्यामुळे शास्त्रीय पद्धतीच्या अवलंबावर विसंबून असतो. तथ्ये सर्वदूर पसरलेली व बऱ्याचवेळा अप्राप्य असतात म्हणूनच शास्त्रीय पद्धतीचे स्वरुप समजावून घेणे आवश्यक आहे. J. W. Best या विषयी प्रतिपादन करतात की,

**''खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धति प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध वा आकारबद्ध, सुव्यवस्थित व सखोल अशी प्रक्रिया होय.'' ...११**

मराठी चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेतील संशोधन हे अशा प्रकारे सुनियोजित तथ्य संकलनावर व विश्लेषणावर भर देणारे आहे.

नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित, स्वीकृत निष्कर्ष व सिद्धान्ताचे पुनःपरिक्षण करण्याच्या हेतुने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग (Experimentation) म्हणजेच संशोधन असे म्हणता येईल.

त्यामुळे चित्रपट संशोधन करताना हे सर्व पैलू विचारात घ्यावे लागतात.

डी स्लेसिंजर (D. Slesinger) व स्टिफेन्सन (M. Stephenson) यांनी सामाजिक शास्त्रांच्या विश्वकोशात संशोधनाची व्याख्या करताना संशोधन प्रक्रियेचे वैशिष्ठ्यपूर्ण पैलू कोणते याचे स्पष्टीकरण केले आहे. त्यांच्या व्याख्येप्रमाणे-

**''(१) सामान्यीकरणाच्या हेतूने संकल्पना वा प्रतीके यांची सहेतुक हाताळणी (Manipulation) करणे, (२) प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात**



15534

**सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे व (३) प्रमाणित ज्ञानाचा सिद्धान्त निर्मितीसाठी व व्यवहारात उपयोग करणे ही संशोधनाची वैशिष्ट्ये आहेत.''...१२**

या संशोधनात या तीनही घटकांचा विचार करून चित्रपट संशोधन क्षेत्रामध्ये तथ्य संकलनात नव्याने भर टाकावयाची आहे. मराठी चित्रपटांची निर्मिती प्रक्रिया का व कशी जटील बनत आहे ते या लघु प्रबंधामध्ये प्रामुख्याने तपासून घेतले आहे. या पार्श्वभूमीवर अशा चित्रपट संशोधनाचे महत्त्व समजावून घ्यावे लागणार आहे.

## २.३ चित्रपट संशोधन

चित्रपट हे एक कलात्मक माध्यम आहे व या माध्यमाचे यश हे त्याच्या प्रेक्षकांच्या पसंतीवर अवलंबून असते. या संदर्भात सुधीर नांदगावकर म्हणतात,

**''मराठी चित्रपटाचे नाव सध्या कानफाट्या पडलेले आहे. सर्वसामान्य चित्रपट रसिकांचा विशेषत: सुशिक्षित मध्यमवर्गीय रसिकांचा, मराठी चित्रपटात काही चांगले घडू शकते, काही प्रयोग होऊ शकतात; काही कलात्मक चित्रपट निघू शकतात, यावरचा विश्वासच उडालेला आहे.'' ...१३**

यावरून असे दिसते की, मराठी चित्रपट निर्मितीची प्रक्रिया ही सोपी नाही. ती जटील बनली आहे. माधव शेवाळे यांच्या मते-

**''चित्रपट हे भारतातील करमणुकीचे एक प्रमुख साधन आहे. चेतना, करमणूक, विरंगुळा, दैनंदिन समस्यातून काही वेळ तरी सुटका, मौज वगैरे हेतुने मुलेच नव्हे तर प्रौढ आणि वृद्धही सिनेमाला गर्दी करतात. चित्रपटांचे मुलभूत कार्य माहिती देणे, शिकविणे आणि करमणूक करणे हे आहे. ते लोकमाध्यमाचे एक प्रमुख साधन आहे.'' ...१४**

मराठी चित्रपटही यास अपवाद नाहीत परंतु हे चित्रपट का यशस्वी ठरत नाहीत? त्याची निर्मिती का अवघड होते? ह्या प्रश्नांचा येथे शोध घ्यावयाचा आहे. शेवाळे पुढे म्हणतात,

**''चित्रपट हे कलात्मकता आणि तंत्रज्ञान यांचा संगम असलेले माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचं प्रभावी माध्यम आहे. चित्रसंवाद व अभिनयाच्या सहाय्यानं कथानक सांगणं ही जशी दृष्यकला आहे तशी श्राव्यकलाही आहे.**

**मनोरंजन, उद्‌बोधन, स्वप्नरंजन, प्रचार, आत्मविष्कार, जीवनभाष्य इ. हेतू या चित्रपट माध्यमाच्याद्वारे प्रभावीपणे मांडता येतात व पाहता येतात.'' ...१५**

या संदर्भात मराठी चित्रपटांची भूमिका येथे तपासून घ्यावयाची आहे. चित्रपट निर्मिती हे एकट्याचे काम नाही. त्यामागे सामुदायिक कलात्मक प्रक्रियांचे भान ठेवावे लागते. शेवाळे म्हणतात,

**''चित्रपटाचे श्रेय एखाद्या व्यक्तिचे नसते ते सांघिक असते. दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि कलाकार या सर्वांच्या सांघिकरणावर असते.'' ...१६**

मराठी चित्रपटात या प्रकाराची सांघिक भावना आहे किंवा नाही याचाही शोध येथे घ्यावयाचा आहे. वसंत साठे यांनी म्हटले होते,

**''एका बाजूला हिंदी सिनेमाचे ग्लॅमर आणि दुसरीकडे नाटकातील कलात्मकता अशा दुहेरी स्पर्धेला मराठी सिनेमाला तोंड द्यावे लागले.'' ...१७**

अशा दुहेरी संकटातून मराठी चित्रपटांना वाटचाल करावी लागली. साठे यांनी केलेली मीमांसा अर्थपूर्ण आहे. त्यांच्या मते,

**''मराठी सिनेमासमोर अस्तित्त्वाचा प्रश्न येतो तेव्हा विनोदी चित्रपट पुन्हा प्रेक्षक खेचून आणतात. हा आजवरचा किस्सा पुन्हा एकदा खरा ठरला.'' ...१८**

मराठी चित्रपटापुढे असे अनेक पर्याय होते. प्रयोगान्ती प्रश्न सुटले नाहीत ते अधिक बिकट झाले. भावी काळात चित्रपट निर्मिती बिकट होत गेली. साठे यांच्या मते,

**''हिंदी सिनेमाचा झगमगाट आणि नाटकांचा कलात्मक साज यामुळे मराठी चित्रपटांनी शहरी प्रेक्षक गमावला. उरला फक्त ग्रामीण प्रेक्षक.'' ...१९**

या ग्रामीण प्रेक्षकांवरच फक्त भिस्त ठेवून वाटचाल करणे अवघड होते.

माधव शेवाळे म्हणतात,

**''हल्ली वर्षाकाठी एका निर्मात्याला एक देखील चित्रपट करणे अवघड झाले आहे. चित्रपट करार पद्धतीमुळे कलावंत वेगवेगळ्या निर्मात्यांशी करार करीत आहेत व त्याचाच परिणाम म्हणजे तारखा देण्याची, मिळविण्याची केवीलवाणी धडपड दिसून येते. शिवाय एकच कलावंत चारसहा ठिकाणी भूमिका करीत असल्याकारणाने त्याचे लक्ष (अभिनय) एका चित्रपटावर केंद्रीत होऊ शकत नाही. आता आऊट डोअर शुटींग म्हणजे नटनटींचा ताफा, त्यांच्या मनाप्रमाणे**

**आवडी पुरविणे, बाळगलेल्या कुत्र्याची देखील लाडाची सोय पुरविणे, पंचतारांकीत हॉटेलमधील जेवण इ. गोष्टी अत्यंत गरजेच्या म्हणून मान्यता पावलेल्या आहेत. कुणीही उठावे पैसा उभारावा व चित्रपटनिर्मिती करावी, कुणीही उठावे दिग्दर्शन करावे, कुणीही कथा संवाद लिहावेत, कुणीही अभियन क्षेत्रात उतरावे.'' ...२०**

या सर्व प्रश्नांचा उहापोह या लघुप्रबंधात केला आहे.

## २.४ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

जेव्हा संशोधन विषय नवा असतो तेव्हा अन्वेषणात्मक आराखडा वापरावा लागतो. प्रा. पु. ल. भांडारकर यांच्या मते,

**''पुढे गृहीतकृत्यांची मांडणी करता यावी किंवा संशोधन समस्येचे स्पष्ट स्वरुपीकरण करता यावे ह्या उद्देशाने जी अध्ययने प्रेरीत झालेली असतात त्यांना अन्वेषणात्मक अध्ययने म्हणता येईल.'' ...२१**

हा अभ्यासही याच पद्धतीने करावयाचा आहे. अभ्यास विषयाचे विविध पैलू उलगडणे व त्याची मीमांसा करणे गरजेचे असते. प्रा. भांडारकर म्हणतात,

**''संशोधनकर्ता ज्या विषयाचे अध्ययन करु इच्छितो त्या विषयासंबंधीच्या चौकशीस संरचनाबद्ध असे स्वरुप देण्यासाठी संशोधनकर्त्यास विषयाच्या विभिन्न पैलुंची माहिती करुन देणे किंवा विषयाचे अध्ययन ज्या स्थितीत करण्याचा त्याचा विचार असतो त्या स्थितीत चांगली माहिती करून देणे अशी दोन्ही कार्ये अन्वेषणात्मक अध्ययनाद्वारा संपन्न होऊ शकतात. संकल्पनाच्या स्पष्टीकरणासाठी, पुढील संशोधन कोणत्या समस्यांची उत्तरे शोधण्याकरीता संचालित करता येण्यासारखे आहे हे जाणून घेण्यासाठी अशा समस्यांचा महत्त्वक्रम निर्धारीत करण्यासाठी व संशोधनकार्य ज्या प्रत्यक्ष स्थितीत केले जाणार आहे त्या स्थितीत कोणत्या प्रत्यक्ष अडचणी आहेत या संबंधीची माहिती मिळविण्यासाठीही अन्वेषणात्मक अध्ययने उपयुक्त ठरतात.'' ...२२**

येथे चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील अडचणी समजावून घ्यावयाच्या आहेत. गृहीतकृताची निर्मिती करणे हे या प्रकाराचे वेगळेपण असते. काट्झ (D. Katz) यांच्या मते,

**''अन्वेषणात्मक अध्ययने शास्त्राच्या प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधीत्व करणारी असतात. या अध्ययनांमुळे संशोधन समस्येच्या स्वरुपीकरणासाठी आवश्यक असणारे ज्ञान संशोधनकर्त्यास प्राप्त होऊ शकते. असे ज्ञान पुढे ज्यांची चाचणी घेण्यासाठी संशोधन कार्य करावयाचे अशा गृहीत कृत्यांच्या निर्मितीसाठी उपकारक ठरते.'' ...२३**

या पार्श्वभूमीवर येथे नवीन मांडणी करावयाची आहे. प्रा. भांडारकर म्हणतात,

**''सद्यपरिस्थितीमध्ये नवनवीन अनुभव या अंतर्दृष्टी प्रदान करणाऱ्या अन्वेषणात्मक अध्ययनांची फार आवश्यकता आहे. अशा अनुभवांच्या या अंतर्दृष्टीच्या पायावरच ज्यांची चाचणी व्यवस्थित व संरचनाबद्ध अशा संशोधनाद्वारे घेता येईल, अशा गृहीतकृत्यांची उभारणी करता येईल. ज्या सर्वसामान्य समस्याक्षेत्राबाबत काहीच ज्ञान उपलब्ध नाही अशा क्षेत्रासाठी अन्वेषणात्मक अध्ययनेच सर्वात जास्त उपयुक्त ठरू शकतात.'' ...२४**

त्यामुळे हा अभ्यास करताना ही पद्धती खरोखर दिशादर्शक ठरू शकते. प्रा. भांडारकरांच्या मते,

**''अन्वेषणात्मक अध्ययनांना एक पृथक् प्रकार मानण्याऐवजी त्यांना अखंड संशोधन प्रक्रियेतील सुरुवातीची पायरी मानावी हे आम्ही मागेच सांगितले आहे. कोणत्याही शास्त्रीय चौकशीत पहिले पाऊलच सर्वात कठीण असते.''...२५**

चित्रपट निर्मितीच्या समस्येबाबत हे संशोधन महत्त्वाचे ठरणारे आहे. गृहितकृत्याच्या निर्मितीसाठी हा अभ्यास पोषक ठरतो.

''अर्थपूर्ण गृहीतकृत्यांच्या निर्मितीसाठी हाती घेण्यात येणाऱ्या अन्वेषणात्मक अध्ययनाकरीता परिणामकारक ठरणाऱ्या स्त्रोत वा पद्धतींबाबत सेल्टीझ (C. Seltiz) जहोडा (M. Jahoda) डवॉइश (M. Deutsch) व कूक (S. M. Cook) इत्यादींनी केलेले विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे-

**''अन्वेषणात्मक अध्ययनात (१) विषयाशी संबंधित साहित्याचे परीक्षण करणे व विषयाशी संबंधित अन्य विषयांचे ज्ञान करून घेणे, (२) अध्ययनासाठी घेतलेल्या विषयांबाबत अनुभवज्ञान असणाऱ्या जाणकार व्यक्तींचे सर्वेक्षण करणे, (३) ज्या उदाहरणांमुळे अंतर्दृष्टीस चालना मिळेल अशा उदाहरणांचे**

**विश्लेषण करणे; या तीन पद्धती अत्यावश्यक आहेत.'' ...२६**

त्यामुळे या संशोधनात हा आराखडा वापरला आहे.

## २.५ अन्वेषणात्मक अध्ययनाचे तीन टप्पे Survey of Literature.

या संपूर्ण संशोधनासाठी अन्वेषणात्मक आराखडा वापरला आहे. त्यातील प्रमुख टप्पे असे आहेत-

**(अ) साहित्य सर्वेक्षण**

ग्रंथ हे अनुभवी सजीवांनी लिहिलेली अचल अशी मार्गदर्शक निर्मिती आहे. आदिम अवस्थेपासून आजच्या एकविसाव्या शतकापर्यंतची मानवाची प्रगती होण्यात साहित्याचा फार मोठा वाटा आहे. मानवाच्या आयुष्याला मर्यादा आहेत पण अनुभव मात्र अमर्याद आहेत. हे अनुभवांचं विश्व समकालीन साहित्यातून प्राप्त होते तसेच ते पिढ्या न् पिढ्या संक्रमित होणारे ज्ञान आहे.

साहित्याच्या सर्वेक्षणामुळे त्या त्या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होते. अशा पारंपारिक ज्ञानाशिवाय किंवा सैद्धान्तिक आधाराशिवाय शोधकार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.

याची उपयुक्तता सांगताना भांडारकर म्हणतात,

**''संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधीत साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेषणात्मक अध्ययनातील एक महत्त्वाचा भाग होय. ज्या विषयाबाबत गृहीतकृत्यांची मांडणीच झालेली नाही. अशा विषयासाठी अन्वेषणात्मक अध्ययने विशेष उपयुक्त असतात.''...२७**

संशोधन करावयाच्या विषयाला सर्वार्थाने माहितीचा पुरवठा होईल ते ते सर्व या साहित्य सर्वेक्षणाच्या कक्षेत येते. चरित्रग्रंथ, वर्णनात्मक ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ इतकेच नव्हे तर विविध मासिके, वृत्तपत्रातील लेख, नभोवाणी दूरदर्शन इ. वरील मुलाखतींचे तसेच इतर विषयांशी संबंधीत अहवाल यांचाही यात समावेश होतो. इतकेच काय चित्रपट हा विषय सामाजिक अंगच असल्याने सामाजिक विषयांना धरून असणारे लेखनही साहित्य सर्वेक्षणाच्या दृष्टीने कसे महत्त्वाचे आहे हे सांगताना भांडारकर म्हणतात,

**''ज्यांचा आपल्या संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबंध आहे त्यांच्यापुरतीच संदर्भग्रंथसूची मर्यादित ठेवणे किंवा तेवढ्याच ग्रंथांचे वा साहित्याचे सर्वेक्षण**

**करणे योग्य ठरणार नाही. ज्यांचा संदर्भच सर्वस्वी निराळा आहे अशा दुसऱ्या विषयक्षेत्रातील संशोधनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना व सिद्धांताचाही स्वक्षेत्रासंबंधी गृहीतकृत्ये मांडताना चांगल्याप्रकारे उपयोग करून घेता येतो.''...२८**

यामुळेच साहित्याचे सर्वेक्षण चित्रपटविषयक संशोधनासाठी करतात. विविध अहवाल, मासिके, विविध दैनिकातील लेख, विविध विशेषांक तसेच जनसंवादाविषयीचे ग्रंथ यांचाही अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**(ब) अनुभव सर्वेक्षण** - Experience Survey.

भांडारकरांच्या मते,

**''संशोधनकर्ता जे विषयक्षेत्र निवडतो त्या त्याच्या बाबतीत इतरांना काय माहिती आहे किंवा इतरांचा काय अनुभव आहे हे संशोधनकर्त्याने जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' ...२९**

अशा अनुभवी व्यक्तिशी संपर्क ठेवला पाहिजे. अशा व्यक्तिंचे अनुभव मार्गदर्शक ठरतात. अशा अनुभवी व्यक्तिंपैकी सर्वांशीच संपर्क साधणे अशक्य आहे म्हणून त्यांच्यापैकी आपल्या संशोधन विषयास पोषक ठरतील अशांचे अनुभव मिळविणे महत्त्वाचे ठरते. व्यावसायिकांना आपापल्या क्षेत्रातील बलस्थाने, उणीवा, यशापयशाच्या बाबी फार जवळून माहिती झालेल्या असतात.

म्हणूनच प्रस्तुत शोध प्रबंधांसाठी पुढील घटकांशी संपर्क साधून सर्वतोपरी सखोल माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रपटाशी संबंधीत तंत्रज्ञ, कलावंत, समीक्षक, पत्रकार, रसीक तसेच जाणकार आणि इतर अभ्यासू व्यक्तिमत्त्व यांच्यापर्यंत जाऊन माहितीचे संकलन केले आहे.

**(क) अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारे घटक**

सामाजिक संशोधनात अंतर्दृष्टीस प्रेरणा देणाऱ्या घटकांचे विश्लेषण (Analysis of insight stimulating factors) हे तिसरे आणि महत्त्वाचे तत्त्व होय.

कधी कधी अभ्यासविषयाशी संबंधीत असे अन्य विषय असतात की ज्यामुळे अभ्यासकाची व्यावहारिक अंतर्दृष्टी विकसीत होऊ शकते. ही अंतर्दृष्टी गृहीतकृत्य निर्माण करण्यास वा वास्तविक संशोधन करण्यास सहाय्यक होते. काही घटना अतिशय सरळ व स्पष्ट असतात. काही व्यक्तिंच्या ठिकाणी विशेष गुण असतात. या सर्वांच्या

निरिक्षणामुळे अभ्यासकाची अंतर्दृष्टी विकसीत होते, प्रोत्साहित होते. नवीन कल्पना सुचतात.

विख्यात मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्राईडला (Sigmund Freud) मानसिक रूग्णांच्या अध्ययनावरूनच अनेक उपयुक्त सैद्धान्तिक कल्पना सुचल्या होत्या व त्याविषयीची अंतर्दृष्टी प्राप्त झाली होती.

**''अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारी गृहीतकृत्ये सुचविणारी उदाहरणे निवडून त्यांचे सखोल अध्ययन करण्याची पद्धतही ज्या विषयक्षेत्रामध्ये समस्यांचे सुस्पष्ट स्वरूपीकरण वा निर्धारण करण्याकरिता पुरेसे मार्गदर्शन उपलब्ध नसते अशा क्षेत्रात कार्य करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी फार उपयुक्त ठरते.'' ...३०**

या अभ्यासात मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रिया व चित्रपटांचे यशापयश यांचा मागोवा घेण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग करून सर्वेक्षण केले आहे व ही प्रश्नावली समस्येच्या मुळाशी जाईल याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. डॉ. भांडारकर याबाबत म्हणतात,

**''नवनवीन गृहीतकृत्यांची मांडणी करण्याचा हेतूच अशा सखोल अध्ययनाच्या मूळाशी असल्याने संकलित तथ्यकणांचे एकात्मपूर्ण संघटन करण्याची व यावरून सम्यक् अर्थबोध घेण्याची क्षमता संशोधनकर्त्यास असणे फार आवश्यक आहे. संशोधनकर्त्याच्या क्षमतेवरच गृहीतकृत्यांची बांधणी अवलंबून आहे. शेवटी या गृहीतकृत्यांची चाचणी वस्तुनिष्ठ पुराव्याच्या आधारे होणारच असते.'' ...३१**

## २.६ संशोधनाची बैठक

या संशोधनाची बैठक ही चित्रपट निर्मिती क्षेत्राशी निगडीत आहे. यामध्ये प्रामुख्याने निर्मिती प्रक्रियेतील अडचणींचा वेध घ्यावयाचा आहे. स्वत: संशोधक हे चित्रपट कलावंत आहेत. अभिनय, लेखन, दिग्दर्शन सहाय्य व निर्मिती या सर्व चित्रपट निर्मिती घटकांविषयी गेली बत्तीस वर्षे ते संबंधित आहेत. त्यामुळे येथे सहभागी निरिक्षण तंत्र वापरले आहे.

सहभागी निरिक्षण करीत असता आपल्या मताचा प्रभाव त्यांच्यावर पडता कामा नये याची खबरदारी संशोधन कार्यात घ्यावी लागते. तसेच सदासर्वकाळ मानवाची मते तीच राहतात असेही नाही. कालानुरुप परिस्थितीनुरुप ती बदलत असतात यांचा प्रभाव स्वत:वर

पाडू न देता संशोधनकर्त्याने पुढील वाटचाल करावयाची असते. याविषयी मार्गदर्शन करताना भांडारकर म्हणतात,

**''महत्त्वपूर्ण गृहीतकृत्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशोधनकर्त्याची भूमिका नेहमी एका सावध सूचना ग्रहण करण्याची असावयास हवी, नवनवीन माहिती जसजशी प्राप्त होत जाईल तसतसे चौकशीचे स्वरुप व तिची दिशा यांच्यात बदल करावयाची सावधगिरी संशोधन कार्याने दाखवावयास हवी.''...३२**

या अभ्यासाच्या संशोधनामध्ये गेल्या पन्नास वर्षाच्या चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील अडचणी लक्षात घेतल्या आहेत व त्या आधारे या अभ्यासाची दिशा ठरवली आहे.

## लघु शोध प्रबंधाची उद्दिष्टे -

कोणतेही सामाजिक संशोधन सुनिश्चित उद्दिष्टांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. या अभ्यासात पुढे दिलेल्या उद्दिष्टांवर भर देणेत येईल.

१. नवीन सहस्त्रकातील २००१ ते २००५ मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेणे.
२. मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील आर्थिक, तांत्रिक तसेच वितरण आणि प्रदर्शन विषयक समस्यांचे आकलन करून नवे उपाय शोधणे.
३. कलाकार, तंत्रज्ञ तसेच रसीक जाणकार, पत्रकार, शिक्षक, प्राध्यापक आणि समीक्षक अशा मराठी चित्रपटांशी संबंधीत विविध घटकांच्या प्रतिनिधींची मते समजावून घेऊन त्या आधारे मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेऊन या समस्यांवर उपाय सुचविणे.
४. मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांवर उपाय सुचवून या संबंधात नवीन प्रतिमाने विकसित करणे.

### गृहीतके -

या अभ्यासासाठी पुढील गृहीतके सुनिश्चित करण्यात आली आहेत.

१. दादासाहेब फाळके यांच्या चित्रपटनिर्मितीपासून आजमिती पर्यंत मराठी चित्रपट निर्मितीला अनेक अडचणींतून जावे लागले आहे.

२. कलात्मकतेच्या आणि नाविन्याच्या अभावी मराठी चित्रपट निरस व रूक्ष बनले आहेत. असे जाणकार व रसीक प्रेक्षकांचे मत बनत चालले आहे.

३. आर्थिक अडचणींमुळे मराठी चित्रपट निर्मिती आणि निर्मिती पश्चात् वितरण व प्रदर्शन अवघड झाले आहे.

४. प्रगत व अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेचा अभाव तसेच दुर्लक्ष यामुळे मराठी चित्रपट व्यवसाय संकटात सापडला आहे. त्यातच मराठी रसिकांनी पाठ फिरविल्यामुळे मराठी चित्रपटाचा आधार दुबळा होत चालला आहे.

५. शासन योजना विचारपूर्वक तयार केलेल्या दिसतात पण प्रत्यक्षात अंमलात येताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कित्येकदा सवलती असून नसल्यासारखी अवस्था आहे.

६. साचेबद्ध मराठी चित्रपट रसिकांच्या पसंतीस उतरत नाहीत.

७. काही अपवाद वगळता गुणवत्तेच्या अभावी मराठी चित्रपट राष्ट्रीय व जागतिक पातळीवर टिकू शकत नाहीत.

## २.७ नमुना निवड

सामाजिक तथ्ये गोळा करण्यासाठी त्या समाजाच्या अथवा समुहाच्या सर्व सदस्यांशी किंवा एकेकाशी संपर्क स्थापन करणे व त्याच्याकडून तथ्य संपादन करणे शक्य होत नाही म्हणून एक वेगळी पद्धती स्विकारली जाते. ह्या पद्धतीत समूहाचे प्रतिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून तथ्ये गोळा केली जातात व ही प्रतिनिधीकडून मिळविलेली माहीती संपूर्ण समूहाची किंवा समग्राची आहे असे मानले जाते. यात 'शितावरून भाताची परीक्षा' घेतली जाते.

समूहावर कारकाचा काय परिणाम होतो हे जाणून घेण्यासाठी त्या समूहातील प्रातिनिधीक एकक (Unit) निवडून त्यावरील परिणामाचे मापन केले जाते हीच नमुना निवड पद्धत होय. ह्या नमुनानिवडीवरून काढलेले निष्कर्ष समग्राचे निष्कर्ष मानले जातात.

श्रीमती यंग यांच्या मते,

**''एक सांख्यिकीय नमुना म्हणजे संपूर्ण समुहाच्या किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय.''**

गुडे आणि हॅट यांच्या मते,

**''नमुना हा नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.''**

नमुना निवडीचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील-

नमुना हा संपूर्ण सामुग्रीचा एक अंश असतो. नमुन्याचे स्वरुप समग्राच्या तुलनेने छोटे असते. नमुना हा पक्षपात व पूर्वग्रहदूषितता ह्यापासून स्वतंत्र असावा. नमुन्याचे ठिकाणी निश्चितता व शुद्धता अधिक प्रमाणात असावी. नमुना हा अध्ययन विषयाला अनुकुल असावा.

नमुना निवडीचे अनेक प्रकार आहेत. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी-

**साधा यादृच्छिक नमुना (Simple Random Sampling)** पद्धत वापरली आहे.

या पद्धतीत एककाची निवड संशोधकाच्या किंवा कोणत्याही व्यक्तिच्या स्वाधीन नसते. त्यामुळे पक्षपात होण्याची शक्यता नसते. नमुना निवड ही यादृच्छिक म्हणजे दैवावर अवलंबून असते. यामुळे या पद्धतीत सर्व एककांना निवडले जाण्याची समान संधी असते. यातील निवड शास्त्रशुद्ध असते.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधासाठी एककाची निवड चित्रपटनिर्मिती प्रक्रियेतील सहभागी अशा सर्व घटकांचा विचार करून केली आहे. कलावंत, तंत्रज्ञ, रसिक, समीक्षक, प्राध्यापक व सर्वसामान्य व्यक्ती अशा सर्व थरातून नमुना निवड करून प्रश्नावली तसेच अनुसूची प्रकारातून तथ्य संकलन केले आहे. सर्व घटकांना न्याय दिल्याने संशोधन कार्य एकांगी न होता सर्वस्पर्शी होण्यास मदत होईल हा त्यामागील हेतू आहे.

यादृच्छिक नमुना निवडीसाठी पुढीलपैकी एक वा अनेक तंत्रे वापरता येतात-

लॉटरी पद्धत, (Lottery Method) कार्ड अथवा तिकीट प्रणाली, (Card or Ticket Method) नियमित अंकन प्रणाली, (Regular Marking Method) अनियमीत अंकन अथवा क्रमांक पद्धती, (Irregular Marking Method) ग्रीड पद्धत, (Grid System) कोटा निवड (Quota Sampling) पद्धती.

नमुना पद्धतीचे काही दोष वगळता महत्त्वाचे गुण आहेत, ज्यामुळे ही पद्धत उपयुक्त ठरते. या पद्धतीमुळे पैशांची बचत होते. सुलभ प्रशासन होते. सविस्तर अध्ययन होते. विश्वसनीय निष्कर्षाप्रत येण्यात मदत होते. माहिती मिळविण्यासाठी सुविधा होते. तसेच समग्र चाचणी पद्धतीला चांगला पर्याय मिळतो.

## २.८ मर्यादा

नमुना पद्धतीच्या ज्या मर्यादा आहेत त्या मर्यादांत राहूनच हे संशोधन कार्य करता येते. तथापी सदरहू संशोधनात हे दोष कसे टाळता येतील याचा काटेकोर विचार केला आहे.

नमुना पद्धतीत पक्षपाताची संभावना असते व असा पक्षपात झाल्यास ह्या पद्धतीने काढलेले निष्कर्षही पक्षपाती व चुकीचे असतात त्यामुळे कोठेही पक्षपात होऊ नये याची दक्षता घेणेत आली आहे.

विशिष्ठ प्रशिक्षणाची आवश्यकता या पद्धतीत यशस्वी होण्यासाठी लागते. तथापी संशोधक (अभ्यासक) हा स्वत: गेली ३२ वर्षे चित्रपट व नाट्यविषयाशी कलावंत, लेखक, दिग्दर्शन या प्रत्येक घटकांशी जवळून परिचित असल्याने वेगळ्या प्रशिक्षणाची गरज भासली नाही.

प्रातिनिधीक नमुना निवडीतील अडचणी - व्यक्ती तितक्या प्रकृती आहेत. प्रत्येकाची अनुभूती, वैचारिक पातळी, ग्रहणशक्ति व विवेचनशक्ति वेगवेगळी असल्याने एकक म्हणून कोणाला निवडल्यास त्या गटाचे योग्य प्रतिनिधित्व होऊ शकेल? हा खरा अडचणीचा प्रश्न आहे. त्यामुळेच या संशोधनासाठी सारासार विवेकशक्तिचा वापर करून योग्य प्रतिनिधित्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

तसेच कोणतीही नमुना निवड अचूक वा बिनचूक असे ठामपणे सांगता येणे कठीण आहे.

**दोषपूर्ण प्रतिनिधी घटक-** (Defective Representative Sample) सामाजिक घटकात विविधता, संकीर्णता व परिवर्तनशीलता असते. निवडलेला घटक खरोखरच समग्राचे प्रतिनिधित्व करीत असेल ही जशी खात्री नसते तसेच त्याच्यात केव्हा परिवर्तन होईल हेही सांगता येत नाही.

**अल्पविश्वसनीयता-** समग्र चाचणीच्या तुलनेने नमुना निवडीचे निष्कर्ष कमी विश्वसनीय असतात. कारण फक्त मोजक्या घटकांचीच चाचणी घेऊन निष्कर्ष काढले जातात.

**अशक्यता** - काही परिस्थितीत ह्या पद्धतीचा उपयोग करणे अशक्य असते. उदाहरणार्थ जनसंख्येचा आकार फार लहान असेल तर त्यातील प्रत्येक एकक महत्त्वाचा

असतो. पण विशाल क्षेत्रात योग्य प्रातिनिधीक नमुना निवडणे अशक्य असते. कारण विशाल जनसमुहात विविधता व वैचित्र्य असते.

**स्थान/स्थळ मर्यादा** - मर्यादित वेळेत सर्वदूर जाऊन संशोधन करणे शक्य नसते. म्हणूनच प्रस्तुत शोधप्रबंधांसाठी कोल्हापूर परिसरातील नमुना निवड केली आहे. कोल्हापूरला दोन स्टुडिओ व खूप चित्रीकरण स्थळे आहेत. अनेक चित्रपटांचे येथे चित्रीकरण होते त्यामुळे शुटींगनिमित्त चित्रपटातील सर्व घटक येथे येतात. शिवाय कोल्हापूर ही कलानगरी असल्याने येथेही चित्रपट निर्मितीत सहभागी होणारे असंख्य कलावंत आणि तंत्रज्ञ तसेच समीक्षक आणि रसीकही आहेत.

**कालावधी निवडीतील मर्यादा** - समग्र आढावा जरी भूतकाळातील चित्रपट निर्मितीचा, जवळ जवळ साठ वर्षांचा घेतला असला तरी मराठी चित्रपटातील वेगळे वळण सर्वांगाने विकसीत होणारे असे दुसऱ्या सहस्रकानंतर दृष्टोत्पत्तीस येऊ लागले आहे त्यामुळे २००१ ते २००५ या कालावधीतील चित्रपट निर्मिती व त्याबाबतीतील समस्या यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे व याच गतीने २००५ नंतरचे आजपर्यंतचे चित्रही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. नमुनानिवडीच्या प्रक्रियेतील दोषांचा विचार करून ते कसे टाळता येतील याचा सर्व मर्यादेतून विचार करणेत आला आहे.

## २.९ आशय विश्लेषण

या पद्धतीमध्ये गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यात रुपांतर करता येते. ह्या तंत्राद्वारे आशय अथवा आंतरिक तथ्य ह्याचे विश्लेषण केले जाते व नंतर निष्कर्ष काढले जातात.

बॅरलसन यांनी म्हटले आहे की-

**''संवादातील आशयाचे वस्तुनिष्ठ सुनियोजित व संख्यात्मक विश्लेषणाच्या संशोधन तंत्रास आशय विश्लेषण म्हणतात.''** ...३३

प्रश्नावलीची उत्तरे देत असता विविध व्यक्तिंची विविध मते असतात. १०० नमुन्यांपैकी किती जणांचे ठराविक मत आहे. उदा. होकारात्मक किती? नकारात्मक किती? यांचा संख्यात्मक विचार करून त्याचे आशयविश्लेषण करण्याचा येथे प्रयत्न आहे. याचमुळे विविध पैलुंबाबत चित्रपट निर्मितीतील वेगवेगळ्या घटकांची टक्केवारी कळून येते.

प्रश्नावलीतील माहीती मागवून, ज्या ठिकाणी अडचण निर्माण झाली त्या ठिकाणी अनुसूची तंत्राप्रमाणे माहीती समक्ष भरून घेऊन तथ्यांचे संकलन करावयाचे आहे. यासाठी निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी आशय विश्लेषणाचे तंत्र अत्यंत महत्त्वाचे आहे असे सांगताना डॉ. काचोळे म्हणतात,

**''आशय विश्लेषण तंत्राशिवाय संशोधनाचे निष्कर्ष काढणे अशक्य बाब असते. अचूक निष्कर्षासाठी तथ्ये गोळा करावी लागतात परंतु यासाठी योग्य त्या तंत्राची निवड करणे आवश्यक असते.'' ...३४**

## २.१० सामुग्रीचे विश्लेषण, निर्वचन व अहवाल लेखन.

(Analysis of data Interpretation & Report Writing)

सामुग्रीचे विश्लेषण व निर्वचन ही संशोधनाची रचनात्मक (विधायक Creative) बाजू होय. त्याशिवाय शोधकार्य पुरे होऊ शकत नाही.

सामाजिक संशोधनाचा उद्देश नवे नियम व नव्या संकल्पना शोधून काढणे व जुने नियम व संकल्पना यांची पुनर्परिक्षा करणे हे असते. जोपर्यंत वैज्ञानिक विश्लेषण व निर्वचन केले जात नाही तोपर्यंत हा उद्देश पूर्ण होत नाही.

कोणत्याही विषयाचे, घटनेचे किंवा समस्येचे कार्यकारण भाव जाणून घेणे हेही संशोधकाचे कार्य असते. हे कार्य तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केल्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. तसेच तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केल्याशिवाय सिद्धान्त व नियम यांचे प्रतिपादन करता येत नाही.

यासाठी पुढील पायऱ्यांनी मार्गक्रमण करावयाचे आहे.

तथ्यांचे संपादन, (Editing of Data) द्वितीयक तथ्यांचे परीक्षण, (Scruitiny of Secondary Data) तथ्यांचे वर्गीकरण, (Classification of Data) संकेतन (Codification) आणि तथ्यांचे सारणीयन (Tabulation of Data)

**अहवाल लेखन-** (Report Writing)

संपूर्ण संशोधन कार्याचे लिखीत विवरण म्हणजे संशोधन अहवाल होय. तथ्यांना सुव्यवस्थीतरीत्या प्रस्तुत करणेसाठी अहवाल लेखन उपयुक्त ठरते. यासाठीच वर्गीकरण, सारणीयन, आकृती व आलेख इत्यादींचा उपयोग करावा लागतो.

डॉ. भांडारकर याविषयी म्हणतात-

**''समाजाला केलेले परिणामकारक व हेतुपूर्वक निवेदन म्हणजेच अहवाल लेखन होय.'' ...३५**

अहवाल लेखन निर्दोष कसे करावे याबाबत डॉ. पु. ल. भांडारकर यांनी पुढीलप्रमाणे मागदर्शन केले आहे.

**''संशोधनाच्या वेगवेगळया अवस्थांमधून ज्या प्रकारच्या कौशल्याची आवश्यकता असते त्यापेक्षा सर्वस्वी वेगळे असे कौशल्य संशोधनाचा अहवाल लिहीतांना लागते.'' ...३६**

तथ्यांमधून काढलेल्या निष्कर्षाचे निरस विवेचन उपयोगी नसते. या शोधकार्यात संख्यात्मक तथ्यांचे गुणात्मक विश्लेषण करण्यावर भर दिलेला आहे. डॉ. काचोळे म्हणतात,

**''परिश्रमपूर्वक एकत्रित केलेले ज्ञान समाजापर्यंत पोहोचण्यासाठी संशोधकाला कलात्मक पद्धतीने त्याचे सादरीकरण करावे लागते.'' ...३७**

या अभ्यासात अन्वेषणात्मक आराखडा वापरुन मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांवर प्रकाश टाकणेत आला आहे. यातून पुढे आलेल्या निष्कर्षांवर यथायोग्य भाष्य केले आहे. या अभ्यासाच्या शेवटी मराठी चित्रपटनिर्मिती प्रक्रियेतील समस्यांबाबत नवी सैद्धान्तिक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.११ समारोप

या प्रकरणात संशोधन विषयासाठी वापरलेल्या संशोधन पद्धतीचे वर्णन केले आहे. तसेच ही पद्धत पडताळून पाहण्यावर भर दिला आहे. मराठी चित्रपट निर्मितीप्रक्रियेशी संबंधीत अशा घटकांतील शंभर नमुना निवड करुन त्यातून प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण, सारणीयन इ. कसे केले व प्राप्त सामुग्रीचे विश्लेषण व निर्वचन करून अहवाल लेखन कसे केले याविषयी विवेचन केले आहे.

पुढील प्रकरणात आजवर मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेविषयीच्या ग्रंथांचा, आत्मचरित्रांचा व लेखांचा आढावा घेण्यात येईल.

***

# संदर्भ सूची

१. पियर्सन कार्ल - 'द ग्रामर ऑफ सायन्स,' (तिसरी आवृत्ती) भाग १ ला, अे ॲन्ड सी ब्लॅक, लंडन, १९११. पृष्ठ क्र. १०-१२.
२. तदेव पृष्ठ क्र. १०-१२.
३. तदेव पृष्ठ क्र. १०-१२.
४. भांडारकर डॉ. पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक श्री. अ. अ. कुलकर्णी, नागपूर. दुसरी आवृत्ती जानेवारी १९८१. पृष्ठ क्र. ३.
५. कॉफमन, फेलिक्स - 'द मेथडॉलॉजी ऑफ सोशल सायन्सेस' ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क, १९४४. पृष्ठ क्र. ८२.
६. लॅराबी एच्. एल.- रिलायेबल नॉलेज, हॉफटन मिफीन कंपनी, १९४५. पृष्ठ क्र. ५
७. पियर्सन कार्ल. उपरोक्त, पृष्ठ क्र. ६.
८. ग्रीनवुड, अनेस्ट, पॉलिन, व्ही. यंग मध्ये उपरोक्त पृष्ठ क्र. ११३.
९. भांडारकर पु. ल. उपरोक्त. पृष्ठ क्र. ८.
१०. 'कॉफमन, फेलिक्स. उपरोक्त. पृष्ठ क्र. २४४.
११. बेस्ट जे. डब्ल्यु. रिसर्च इन इज्युकेशन, प्रेटिन्स हॉल ऑफ इंडिया १९६३, पृष्ठ क्र. ४.
१२. 'एनूसायक्लोपिडिया ऑफ सोशल सायन्सेस,' मॅकमिलन बुक कंपनी, ११४४ खंड XII न्यूयॉर्क.
१३. नांदगावकर सुधीर. मराठी सिनेमा नव्याची चाहुल, 'वास्तव रुपवाणी, मराठी चित्रपट विशेषांक २००३.' पृष्ठ क्र. ४.
१४. शेवाळे माधव. भारतीय चित्रपट. नीहारा प्रकाशन, पुणे, १९९३. पृष्ठ क्र. १४८.
१५. तदेव पृष्ठ क्र. १४८.
१६. तदेव पृष्ठ क्र. १५२.
१७. साठे वसंत, बखर सिनेमाची, प्रकाशक किरण शांताराम, १९६२. पृष्ठ क्र. १३३.
१८. साठे वसंत, तदेव पृष्ठ क्र. १३९.
१९. साठे वसंत, तदेव पृष्ठ क्र.१३३.

२०. शेवाळे माधव, उपरोक्त, पृष्ठ क्र.
२१. भांडारकर पु. ल., उपरोक्त, पृष्ठ क्र. १३४.
२२. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३४.
२३. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३४.
२४. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३६.
२५. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३६.
२६. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३७.
२७. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३७.
२८. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १३९.
२९. भांडारकर पु. ल., तदेव, पृष्ठ क्र. १४०.
३०. भांडारकर पु. ल. तदेव., पृष्ठ क्र. १४१.
३१. भांडारकर पु. ल. तदेव., पृष्ठ क्र. १४१.
३२. भांडारकर पु. ल. तदेव., पृष्ठ क्र. १४४.
३३. काचोळे डॉ. दा. धों. सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९३. पृष्ठ क्र. २८५.
३४. काचोळे डॉ. दा. धों., तदेव. पृष्ठ क्र. २८५.
३५. भांडारकर पु. ल., उपरोक्त पृष्ठ क्र. १४५.
३६. भांडारकर पु. ल., तदेव पृष्ठ क्र. १४६.
३७. भांडारकर पु. ल., तदेव पृष्ठ क्र. २९२.

□□□